नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 21/10/2021 (गुरूवार)

(सायंकाळ)

---

## कुवारा भिवसन येथील खुन प्रकरणातील आरोपींना 24 तासांचे आत केले जेरबंद
## –: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :–

दिनांक 21/10/2021 रोजी फिर्यादी नामे रजत बापुजी वाडीभस्मे, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, अरोली, ता. रामटेक, जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनांक 20/10/2021 रोजी त्यांचा मोठा भाऊ रवी उर्फ बंटी बापुजी वाडीभस्मे, वय 30 वर्ष यास प्रदीप डोकरीमारे, रा. काचुरवाही याने कार्यक्रम असल्याचे सांगुन त्यास कुवारा भिवसन येथे बोलावुन तेथील जंगलामध्ये दोन ते तिन साथीदारासह रवी उर्फ बंटी वाडीभस्मे याचा खुन केलेला असुन मृतदेह तेथे फेकुन फरार झालेले आहेत. अशा खबरे वरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे सदर घटने बाबत अप.क्र. 253/21 कलम 302,34 भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर सा., नागपुर ग्रमिण यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. स्था.गु.शा.ना.ग्रा. व त्यांचे पथकाने सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळालेल्या गोपनिय माहीती वरून पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मौजा काचुरवाही शिवारात सापळा रचुन आरोपी इसम नामे 1) प्रदीप सहदेव डोकरीमारे, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, काचुरवाही, त. रामटेक, जि. नागपुर, 2) रोहन मधुकर चवरे, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, काचुरवाही, त. रामटेक, जि. नागपुर, 3) आकाश मातादीन बरसे, वय 32 वर्ष, रा. मौजा निमखेडा, त. मौदा, जि. नागपुर ह.मु. शितलवाडी, त. रामटेक जि. नागपुर यांना ताब्यात घेवुन त्यांना सखोल विचारपुस केली असता आरोपी नामे प्रदीप डोकरीमारे याने सांगीतले की मृतक रवी उर्फ बंटी वाडीभस्मे याचे पत्नी सोबत त्याचे अनैतिक संबंध होते. त्याबाबत मृतक यास माहीती झाल्याने तो त्यांचे संबंधामध्ये नेहमी अडथळा आणुन मृतक हा त्याचे पत्नि सोबत तसेच त्याचे सोबत नेहमीच झगडा भांडण करीत असे. या कारणा वरून प्रदीप डोकरीमारे याने रोहन चवरे व आकाश बरसे यांचे मदतीने बंटी वाडीभस्मे याचा खून करण्याची योजना आखली. त्यानुसार दिनांक 20/10/2021 रोजी धार्मीक कार्यक्रम असल्याचे मृतक रवी उर्फ बंटी वाडीभस्मे यास सांगुन मौजा कुवारा भिवसन येथे बोलाविले. व आरोपी प्रदिप डोकरीमारे याने दारु पिण्याचे कारण सांगुन कुवारा भिवसन मंदिरापासुन दुर अंतरावर नेवुन त्याचे इतर साथीदार नामे रोहन चवरे व आकाश बरसे यांचे मदतीने तेथे मृतकाचा गळा आवळुन, त्यास खाली पाडुन दगडाने ठेचुन त्याची हत्या करून मृतकाचे शव कुवारा भिवसन परिसरातील जंगलात फेकुन दिले आहे. नमुद तिनही आरोपीतांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांना पुढील तपासकामी पोलीस स्टेशन पारशिवनी यांचे ताब्यात दिलेले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन पारशिवनी करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार मदन आसटकर, नापोशि उमेश फुलबेल, पोशि विपीन गायधने, रोहन डाखोरे, अमोल वाघ, चालक अमोल कुथे व सायबर सेलचे सतिश राठोड यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर